प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे 17, 2018

**दि चित्तुर को-ऑपरेटिव टाऊन बँक लि. चित्तुर, आंध्र प्रदेश ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु.**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु होणारा) कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ(1)(क) ने तिला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, दि चित्तुर को-ऑपरेटिव टाऊन बँक लि., चित्तुर, आंध्र प्रदेश ह्यांचेवर रु.10,000 (रुपये दहा हजार) दंड लागु केला आहे व हा दंड, संचालक व त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्जे व अग्रिम राशी देण्याबाबत, भारतीय रिझर्व बँकेने दिलेल्या निर्देशांचे व मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केल्यामुळे लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य, बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन, भारतीय रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाली असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/3020**